## नियमीत दिवाणी दावा क्र. ७३/२०१४ मधील निशाणी क्र.६८ कडील अर्जावर आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे त्यांच्याविरुध्द निशाणी क्र.६३ खाली पारित करण्यात आलेला उलटतपास नाही हा आदेश रद्द करुन प्रतिवादी क्र. १५ मोहम्मद बेग यांचा उलटतपास घेण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रस्तुतचा अर्ज वाचला.

२) प्रस्तुत अर्जास म्हणणे देण्याबाबत प्रतिपक्षास आदेशीत केले आहे. परंतु प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींच्या म्हणण्याशिवाय पुढे चालविण्याबाबत प्रस्तुत अर्जावर आदेश पारीत केला आहे.

३) प्रस्तुत अर्जाच्या युक्तिवादाकामी वादी व प्रतिवादींच्या विद्वान वकीलांना पुकारले असता गैरहजर असल्याने प्रस्तुत अर्जावर वादी व प्रतिवादींतर्फे युक्तीवाद नाही असा आदेश पारीत केला आहे. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, दिनांक १६/१२/२०२१ रोजी प्रतिवादी क्र.१५ मोहम्मद बेग यांच्या उलटतपासासाठी वादी व वादींच्या विद्वान वकीलांना पुकारले असता गैरहजर असल्याने वादींतर्फे उलटतपास नाही असा आदेश निशाणी क्र.६३ खाली पारीत करयात आला आहे. प्रकरणाचे स्वरुप विचारात घेता माझ्या मते वादींना या कामी प्रतिवादी क्र. १५ यांचा उलटतपास घेण्याची संधी देवुन प्रस्तुतचे प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निकाली काढणे न्यायाचे व उचित ठरेल. त्यामुळे वरील नमुद कारणांमुळे माझ्या मते प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायाचे व उचित ठरेल. सबब हे न्यायालय

न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो व त्यानूसार वादींविरुध्द निशानी क्र.६३ खाली दिनांक १६/१२/२०२१ रोजी 'वादींतर्फे प्रतिवादी क्र.१५ चा उलटतपास नाही' असा पारीत केलेला आदेश रद्द करुन वादींना प्रतिवादी क्र.१५ मोहम्मद बेग यांचा उलटतपास घेण्यास परवानगी देण्यात येते.

२. वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2022.02.09 16:43:57 +0530

(पां.लिं. घुले)

दिनांक– ०९/०२/२०२२

दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
दारव्हा.